ज्ञान प्रबोधिनी प्रशाला ५१

# 51@51

आम्ही ५१!



## गोष्ट क्र. ४१

स्मिता ठोंबरे–देशपांडे

(इ. १०वी १९८१)

दि. १७ ऑक्टोबर २०२१

नोटा बंदीच्या काळात सगळ्याच बँकांचा प्रवास अतिशय खडतर झालेला होता. तसाच आमच्या बँकेचा ही होता. सगळेजण उशिरापर्यंत थांबून काम करत होतो. बँकेत पाय ठेवायला जागा नाही अशी परिस्थिती होती. तेव्हा आम्ही येतील तशा नोटा स्वीकारून त्याचे अतिशय पद्धतशीर नियोजन करून, त्याचं जे रिपोर्टिंग होतं ते व्यवस्थित करू शकलो. यामध्ये आमच्याकडे कोणत्याही प्रकारचा ताण नव्हता. आमच्याकडे संचालक मंडळाचं काहीच प्रेशर नाहीये, की माझ्या ओळखीच्या माणसाला इतके पैसे द्या असा आग्रह आमच्याकडे कधीच घडत नाही. अतिशय पारदर्शक आणि निःस्पृहपणे काम करणारे संचालक मंडळ आहे आमचं. याचा मला खूप अभिमान आहे. त्याच्यामुळेच आम्ही इतक्या मोकळेपणाने आणि दडपणाशिवाय काम करू शकतो. त्यामुळे आमच्याकडून चांगल्या गोष्टी घडतात. त्या नोटा बंदीच्या काळात लोकांना रोख रक्कम मिळायची नाही. मग त्यावरून वाद, भांडणं व्हायची. तेव्हा मी स्वतः तीन वेळा मुंबईमध्ये रिझर्व्ह बँकेत जाऊन आणि अशाच अनेक मार्गांनी धडपड करून शक्य तितक्या लोकांना रोख रक्कम मिळेल असा प्रयत्न केला.

**शिस्त आणि चांगल्या सवयींचा परिपाठ**

ज्ञान प्रबोधिनी प्रशालेची युवतींची तुकडी सुरू होणार हे जेव्हा माझ्या पालकांना कळलं तेव्हा त्यांनी मला शाळेच्या प्रवेश परीक्षेला बसवलं. शाळेला प्रवेश परीक्षा असणं हेच प्रशालेचं पहिलं वेगळेपण. शाळेत प्रवेश झाला. बाहेरच्या मुलांपेक्षा शाळेच्या वेळा, अभ्यास सगळंच वेगळं होतं. वर्गात २५ जणी असल्यामुळे शिक्षकांचं कायम लक्ष असायचं. युवतींची पहिलीच तुकडी असल्याने हेमाताई, लताताई या आमची खूप काळजी घ्यायच्या, समजून घ्यायच्या. सुरुवातीचा काही काळ असे लाड झाल्यावर, शाळेने शिस्तही अगदी तशीच लावली. जिना डाव्या बाजूनेच चढायचा आणि डाव्या बाजूनेच उतरायचा, प्रत्येक मिनिटाचा हिशोब लागला पाहिजे, अशा छोट्या-छोट्या गोष्टीतून शाळेत शिस्त शिकायला मिळाली. वक्तशीरपणा, काम करायच्या योग्य पद्धती या शाळेकडून मिळालेल्या देणग्या आहेत असंच वाटतं.

मला आठवत असणारे शाळेतले उपक्रम म्हणजे अभ्यासयज्ञ. दसरा आणि गुढीपाडवा या दोन्ही सणांना परीक्षा जवळ आलेल्या असायच्या. या दिवशी सकाळी ७ वाजता शाळेत जायचं, मौन धारण करायचं आणि संध्याकाळ पर्यंत अभ्यास करायचा. प्रत्येक गोष्ट करताना ती अभ्यासपूर्ण असायला हवी याचा परिपाठ शाळेने घालून दिला. ते वयही मागे लागून करण्याचं होतं, ते तसचं झालं आणि आज त्याची फळं चाखायला मिळत आहेत असं वाटतं. परिसंवाद, वक्तृत्वासारख्या उपक्रमांमधून माझं संवाद कौशल्य विकसित झालं. आपले विचार धीटपणे पुढे उभे राहून मांडता आले पाहिजेत, दिलेल्या विषयावर विचार करता यायला पाहिजे, आजही या शाळेत शिकवलेल्या कौशल्याचा खूप उपयोग होतो.

आमच्या सगळ्यांचं श्रद्धास्थान म्हणजे आप्पा. ते आमच्याबरोबर सहा वर्षं होते, ते वर्गात तास घ्यायला यायचे, बोलायचे याचा खूप आनंद वाटतो. ते प्रत्येकीची आपुलकीने चौकशी करायचे. त्यावेळी आपण एवढ्या मोठ्या व्यक्तीशी बोलत आहोत याचा अंदाजही नव्हता.

शाळेतला आणखी एक उपक्रम म्हणजे विक्री उपक्रम. राख्या, तांदूळ असे आम्ही विकायला जायचो. बाकीचे मित्र-मैत्रिणी आमची चेष्टा करायचे. पण एखादी गोष्ट घ्यावी म्हणून समोरच्याची तशी समजूत घालता यायला लागली त्याचा मला खूप उपयोग होतो. परिस्थिती बघून, माणसं बघून, कुठे काय, कसं बोलावं हे शिकता येतं. शाळेला सुट्ट्या कमी असायच्या, रविवारी पण शाळेत जायचो. गणेशोत्सव व आषाढी वारीची तयारी यामुळे दिवस कायम भरगच्च असायचा.

**वाणिज्य शाखेची निवड**

शाळा संपल्यावर मला वाणिज्य शाखा निवडायची आहे याची मला स्पष्टता होती. मला पहिल्यापासून बँकेचं खूप आकर्षण होतं. माझे वडील finance क्षेत्रामध्ये काम करत असल्याने घरचे वातावरण याला थोडे पोषक होते. ११वीत गेल्यावर प्रबोधिनीत Co education असायला हवं असं वाटायचं. थोडासा superiority complex यायचा. कशाला कट्ट्यावर बसायचं? कशाला फुकटच्या गप्पा मारायच्या असं वाटायचं. कधी-कधी त्यामुळे शिष्ठ, स्वतःला हुशार समजणारे अशी टीकाही मित्र-मैत्रिणींकडून कधीतरी ऐकायला यायची.

मी जेव्हा १८ वर्षांची झाले तेव्हा बाबांच्या एका मित्राच्या मदतीने बँक ऑफ महाराष्ट्रमध्ये passbook writing clerk या पदावर नोकरी करायला सुरुवात केली. घरची आर्थिक परिस्थिती हा मुख्य मुद्दा नसून बँकेतील काम शिकायचं होतं म्हणून सुरू केलेली internship असं म्हणता येईल. त्याच बरोबर मी ICWA च्या परीक्षा द्यायचं ठरवलं होतं. त्यामुळे सकाळी कॉलेज, शिकवण्या आणि मग नोकरी असा भरगच्च दिवस असायचा. त्याच काळात LIC, रेल्वे सेवा, MPSC अशा अनेक परीक्षा दिल्या. १९८६साली जून मध्ये माझं बी.कॉम. पूर्ण झालं. मला LIC, सचिवालय आणि आत्ता कार्यरत असलेली बँक अशा तीन संधी एकाच वेळी चालून आल्या होत्या. तेव्हा माझं लग्न झालेलं असल्याने व परगावी जायची बंधनं असल्याने बँकेची नोकरी निवडली आणि फेब्रुवारी १९८७साली मी नोकरीत रुजू झाले. पुढे मी नोकरी करत-करत पदव्युत्तर शिक्षण पूर्ण केलं.

**भगिनी निवेदिता सहकारी बँकेतील कारकीर्द**

मी सध्या भगिनी निवेदिता सहकारी बँकेत काम करते. आमची बँक सहकारी क्षेत्रातली आहे व संपूर्णपणे महिलांनी सगळ्यांसाठी चालवलेली ही बँक आहे. १९७४साली या बँकेची स्थापना झाली. सामान्य माणसांना सावकारांच्या पाशातून सोडवण्यासाठी आणि गरजू, असाहाय्य महिलांना उद्योगासाठी भांडवल मिळवून देण्यासाठी ही बँक सुरू केली. CA विवेक दाढे आणि मीनाक्षी दाढे यांची ही मुळातली संकल्पना होती. आमच्या पुणे आणि सातारा अशा एकूण अठरा शाखा आहेत. बँकेच्या संचालक मंडळात अनेक क्षेत्रात तज्ज्ञ असलेल्या व्यक्ती आहेत आणि संपूर्णपणे निःस्पृहतेने काम करतात. गेली तेरा वर्षे मी बँकेची CEO म्हणून कारभार पाहते आहे. वयाच्या ४२व्या वर्षी मला ही संधी मिळाली. बँक चालविण्यासाठी RBI

चे निकष आहेत, त्याचे आम्ही परिपूर्ण पालन करतो. बँकेची आर्थिक परिस्थिती भक्कम आहे. व्यवहार कायम चोख आणि पारदर्शक असतो. आमचे कर्मचारी अगदी निष्ठावान आणि  कष्टाळू आहेत, आमच्या सगळ्या कर्मचाऱ्यांचं आमच्या बँकेवर प्रेम आहे आणि नितांत श्रद्धा आहे. आपल्याकडे काय होऊ शकत नाही, आपण कशी कामं करत नाही हे आमच्या सगळ्या कर्मचाऱ्यांना कायम माहित असतं. नियम हे पाळण्यासाठी असतात याची शिस्त बँकेत आहे. आम्ही इतर वेळेस जरी कुटुंबाप्रमाणे वागत असलो तरी ग्राहकांच्या समोर व्यावसायिक आचरण असलंच पाहिजे, हे आम्ही सगळे काटेकोरपणे पाळतो.

आपल्याला भगिनी निवेदितांच्या नावाच्या बँकेत काम करायला मिळत आहे हा ही मला माझा योगच वाटतो.  त्यांच्या १२५व्या जयंतीच्या कार्यक्रमाला लताताईंनी लिहिलेलं पद्य आमच्या बँकेतल्या एका मुलीने गायलं होतं, या सगळ्या योगायोगा बद्दल फार समाधान वाटलं.



पुणे : डॉ. सुमितताई सातारकर (डावीकडून) यांना भगिनी निवेदिता सहकारी बँकेच्य सीईओ स्मिताताई देशपांडे यांच्या हस्ते सन्मानचिन्ह प्रदान करण्यात आले. याप्रसंगी उपस्थि आर. एम. धारिवाल फाउंडेशनच्या अध्यक्षा जान्हवीताई धारिवाल.

**आमच्या बँकेविषयी**

भगिनी निवेदिता बँकेच्या आमच्या अठरा शाखा आहेत आणि तेराशे पन्नास कोटींचा व्यवसाय आहे. सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे आज सगळ्या बँकांच्या समोर सगळ्यात मोठे आव्हान आहे ते एनपीएची ((NPA- Non Performing Asset))  वसुली. ही वसुलीसुद्धा आम्ही सर्व महिला अतिशय उत्तम रीतीने करतो आहोत. आम्ही केलेली एनपीएची वसुली वाखाणण्याजोगी आहे. याबद्दल आम्हाला अनेक ठिकाणाहून पारितोषिके मिळालेली आहेत. आजपर्यंत बँकेला तीनवेळा महाराष्ट्र शासनाने पुरस्कार देऊन सन्मानित केलेले आहे. आजसुद्धा जर बघितलं तर आमचा एनपीए (अगदी या करोनाच्या काळानंतर) आणि रिझर्व्ह बँकेने अतिशय कडक नियम केल्यानंतरच्या पद्धतीनुसार सुद्धा २.५% ग्रॉस एनपीए, ही खूपच चांगली सिद्धी आहे. ही सगळी वसुली आम्ही महिला मिळूनच करतो. यामध्ये कुठे तरी ताकदीचा वापर करून आणि आपण म्हणतो की muscle power वापरून वगैरे केलं जातं असं काहीही केलेलं नाहीये. हे आम्ही आमच्या पद्धतीने अतिशय चांगली मॅनेजमेंट करून करत आहोत. यामध्ये ज्याप्रमाणे आम्ही छोट्या-छोट्या लोकांना कर्ज दिलेलं आहे त्याप्रमाणेच मोठ्या उद्योगांना पण कर्ज दिलेली आहेत. आम्हाला नक्कीच अभिमानाची गोष्ट अशी आहे, की बँकेत एका व्यक्तीला किंवा एका संस्थेला किंवा कंपनीला कर्ज देण्याची मर्यादा सुद्धा खूप चांगली आहे. आता बदललेल्या निकषांनुसार कंपनीला किंवा व्यक्तीला सतरा कोटी पर्यंत कर्ज देऊ शकतो. मोठ्या-मोठ्या कंपन्या, ऑटोमोबाईल कंपन्या यांना आम्ही तेवढी मोठ्या रकमेची कर्ज दिलेली आहेत.

एक  मासळी उद्योगातील महिला आहेत, ज्यांनी आमच्याकडे पंचवीस हजाराचं कर्ज पहिल्यांदा घेतलं होतं. टोपलीमध्ये मासे विकायच्या आणि आज त्यांनी स्वतःच्या उद्योगाची मजल मोठ्या फिश मॉल पर्यंत नेलेली आहे आणि कोट्यावधी रुपयांचा व्यवसाय करत आहेत आणि अतिशय उत्तम परिस्थिती आहे. मोठ्या-मोठ्या जागा घेतलेल्या आहेत. अशाच प्रकारे छोट्या उद्योगांपासून मोठ्या झालेल्या व्यावसायिकांची अनेक उदाहरणे माझ्याकडे आहेत की ज्यांनी आमच्याकडे पहिल्यांदा २५  हजारापर्यंत कर्ज घेतलेली व्यक्ति/उद्योग आज दहा कोटी पर्यंत पोचले आहेत.  अशा वेळेस  मला अतिशय आनंद होतो की ते उद्योजक आमच्या बरोबरच मोठे झाले आहेत.








**नोटा बंदी आणि करोना काळातील आव्हाने**

नोटा बंदीच्या काळात सगळ्याच बँकांचा अतिशय खडतर प्रवास झालेला होता. तसाच आमच्या बँकेचा ही होता. उशिरापर्यंत सगळेजण थांबून काम करत होतो. बँकेत पाय ठेवायला जागा नाही अशी परिस्थिती होती. तेव्हा आम्ही येतील तशा नोटा स्वीकारून त्याचे अतिशय पद्धतशीर नियोजन करून, त्याचं जे रिपोर्टिंग होतं ते व्यवस्थित करू शकलो. यामध्ये आमच्याकडे कोणत्याही प्रकारचा ताण नव्हता, दबाव नव्हता. आमच्याकडे संचालक मंडळाचं काहीच प्रेशर नाहीये, की माझ्या ओळखीच्या माणसाला इतके पैसे द्या असा आग्रह आमच्याकडे कधीच घडत नाही. अतिशय पारदर्शक आणि निःस्पृहपणे काम करणारे संचालक मंडळ आहे आमचं. याचा मला खूप अभिमान आहे. त्याच्यामुळेच आम्ही इतक्या मोकळेपणाने आणि दडपणाशिवाय काम करू शकतो. त्यामुळे आमच्याकडून चांगल्या गोष्टी घडतात. त्या नोटा बंदीच्या काळात लोकांना रोख रक्कम मिळायची नाही. मग त्यावरून वाद, भांडणं व्हायची. तेव्हा मुंबईमध्ये रिझर्व्ह बँकेपर्यंत धडक मारण्याचं कामसुद्धा मी केलं. तीन वेळा स्वतः मुंबईला जाऊन आले आणि अनेक मार्गांनी प्रयत्न करून शक्य तितक्या लोकांना रोख रक्कम मिळेल असा प्रयत्न केला.

तसंच आत्ता करोनाच्या काळात, अगदी पहिल्या दिवसापासून बँकेच्या सर्व शाखा काम करत आहेत. घरात लहान मुलं आहेत, म्हातारी माणसं आहेत तरी आम्ही बँकेमध्ये येऊन काम करत होतो. त्या सगळ्या गोष्टींना सामोरे जात होतो. सरकारी रुग्णालयांमध्ये, करोना सेंटरला काम करणारे कर्मचारी आमच्या बँकेत येत होते; पण असा विचार केला की ती पण माणसंच आहेत ना, ते तिथे फ्रन्ट लाइनला काम करतात. ते आपल्याकडे आले तर आपल्याला काय धोका आहे? आपण काळजी घ्यायची, जे होणार आहे त्याला धीराने सामोरं जायचं अशा पद्धतीने आम्ही या आव्हानाला तोंड दिले. आमच्याकडेही अनेक लोक त्या काळात कोरोनाग्रस्त झाले. अगदी हॉस्पिटलच्या इतकं नाही पण बँकांनीही त्या काळात खूप काम केलंय. नोटा कुठून यायच्या माहिती नाही, कुठून लोक येतात कळत नाहीये, तरीसुद्धा सगळे धोके पत्करून, कर्मचाऱ्यांमध्ये ती उमेद निर्माण करून काम केलं. दुसऱ्या बँकांमध्ये घडलेल्या घटना, कोणीतरी पॉझिटिव्ह निघाले, कोणीतरी गेले आहे याचा ताण होता, घाबरून जाणं होत होतं, त्यामुळे मानसिक खच्चीकरण झालेलं होतं. त्यातूनच सगळ्यांना बांधून ठेवून पुढे-पुढे नेणं, हे एक आव्हानच होतं. आपली काळजी घेऊन, आपल्या घरातल्यांची काळजी घेऊन, आपली कर्तव्य पार पाडायची आहेत हे एक आव्हान होतं ते सगळ्यांनी चांगलं पार पाडलं.








अनेक महिला उद्योजिकांबरोबर मी काम केलेलं आहे. समाजात काही उदाहरणे अशी असतात, की महिलांची नावं असतात पण त्या नावापुरत्या आणि व्यवसाय मात्र पुरुषच बघत असतात. पण खरोखर काम करणाऱ्या अनेक महिला आहेत. डॉक्टर, आर्किटेक्ट अशा व्यावसायिक महिला तर खूप आहेत. अशा महिलांनी आमच्याकडे कर्ज घेतलेले आहे पण त्याचबरोबर प्रोडक्शन युनिट किंवा मॅन्युफॅक्चरिंग युनिट चालवणाऱ्या महिलासुद्धा आमच्या ग्राहक आहेत. उलट त्या जास्त चिकित्सक असतात, जास्त चांगल्या पद्धतीने व्यवसाय करतात. ज्या महिला घरातल्या व्यवसायामध्ये किंवा स्वतःच्या व्यवसायमध्ये स्वतः लक्ष घालतात तिथे एक शिस्तबद्ध काम चालू आहे याचा अनुभव नेहमी येतो. आम्ही दरवर्षी महिला उद्योजकांना पुरस्कार देतो. त्यांना हे खूप प्रेरणादायी असतं.

**सतत सजगता**

सायबर फ्रॉडच्या बाबतीत म्हटलं तर दर दोन-चार दिवसाला काहीतरी फ्रॉड होत असतात. त्याबद्दल RBI ने जे कडक निकष लावलेले आहेत त्याची पूर्तता वेळोवेळी करणे आवश्यक असते आणि ते केल्याशिवाय पर्याय नाही. काही लोक असे म्हणतात, की आम्ही छोटी बँक आहोत म्हणून आम्हाला हे परवडणार नाही. पण जेव्हा आम्ही बँक म्हणून व्यवसायात येतो, जेव्हा तुम्ही बँकेचं लायसन्स घेतलं आहे, तुम्ही अकाउंट उघडलेली आहेत, त्यामुळे तुम्ही असं म्हणू शकत नाही की आम्ही सिक्युरिटी करू शकत नाही. एखाद्या व्यक्तिला काहीतरी फटका बसला तर प्रश्न निर्माण होऊ शकतात. त्यामुळे सायबर सिक्युरिटी साठी वेळोवेळी इन्शुरन्स करणं, त्याच्या पॉलिसी करणं हे वेळोवेळी करावे लागते. आम्ही अतिशय चांगल्या पॉलिसीज बँकेसाठी करून घेतलेल्या आहेत. आमच्याकडे सगळेजण त्याच्यात लक्ष घालतात. आज आमच्याकडे RTGS, NEFT, UPI, G Pay, फोन पे या सगळ्या गोष्टी आहेत. आम्हाला इंटरनेट बँकिंगची परवानगी मिळालेली आहे. फक्त आम्ही अजून ते अंमलात आणलं नाही. ते सुरू करण्याचा आम्ही प्रयत्न करत आहोत. सध्याच्या काळात ज्या-ज्या सुविधा लागतात त्या आणण्याचा आम्ही प्रयत्न करत आहोत. त्याच्याबरोबरच त्याची सिक्युरिटी पण येते. त्यामुळे खूप वेगळी अशी काही प्रोडक्स घेताना जी आपल्या खातेदारांच्या गरजेची आहेत असा विचार केला जातो. त्याच्यासाठी लागणारी ऑडिट आणि लागणाऱ्या टेस्ट आमच्या सतत चालू असतात.

सध्या सहकारी बँकांपुढे खूप मोठं आव्हान आहे. ते असे आहे, की राष्ट्रीयकृत बँकांच्या मागे सरकार आहे. त्यांच्याकडे जर काही कमी-जास्त झालं तर त्यांचं अस्तित्व काही धोक्यात येत नाही. कारण कसलाही तोटा झाला, काही झालं तरी त्यांना सरकारचं आर्थिक पाठबळ असतं. त्यांना प्रत्यक्ष तसा काही त्रास होत नाही. त्या बँकेत काही प्रश्न निर्माण झाला तरी पैसे बुडणार नाहीत याची खात्री असते. पण सहकारी बँकांच्या बाबतीत असं होत नसल्याने आमच्या सारख्या चांगल्या बँकांनासुद्धा सेक्टरमध्ये घालण्याचा धोका आहे. आता नाव राखण्यासाठीची धडपड आहे. आता सगळं risk based झालेलं आहे. सगळ्यात मोठी आहे ती सेक्टरची रिस्क. ती पण खूप वाढलेली आहे. प्रगत तंत्रज्ञान आणि चांगले व्यावसायिक खातेदार हवेत यासाठी स्पर्धा वाढलेली आहे. कायदे बदलले आहेत. बँकिंग रेग्युलेशन ॲक्टमध्ये बदल झालेला आहे. RBI च्या रोज काहीतरी नव्या सूचना येतात. त्याच्यामुळे रोजच्या दिवसाला बदलत जाणारं हे बँकिंग क्षेत्र आहे. त्याला सामोरं जाऊन आपण आपली पत, अस्तित्व टिकवायचं हे फार मोठ आव्हान आहे. कारण खातेदार पण समाधानी राहिले पाहिजेत, आपले कर्मचारी पण आनंदी राहिले पाहिजेत आणि त्याच वेळेस आपले रेग्युलेटर (RBI) पण आपल्या कामकाजाबद्दल समाधानी असले पाहिजेत. आपण कुठल्याही नियमांचे उल्लंघन पण करायचं नाही आणि तरीसुद्धा व्यवसाय वाढवला पाहिजे, हे आव्हान आहे. २०१९-२० हे वर्ष थोडं मंदीमध्ये गेले. खरंतर पुण्यामध्ये आयटी सोडता आपण बऱ्याच प्रमाणात ऑटोमोबाईल सेक्टरवर अवलंबून आहोत. २०१९-२० आणि त्यानंतर २०२०-२१ मध्ये ही करोना मुळे सर्व ठिकाणी दोन पावले मागे गेलो आहोत. परत पूर्वपदावर येणे हे फार मोठे आव्हान आहे. वसुलीसाठी गेलेली आमची लोकं सांगतात,

लोकांची परिस्थिती खरंच काही-काही ठिकाणी अशी जाणवली,  की असं वाटत होतं आपणच खिशातून त्यांना काही पैसे द्यावेत आणि परत यावं. पण आता हळूहळू सुधारत आहे, पुढे अजूनही सुधारेल. सगळीकडे परिस्थिती हळूहळू पूर्वपदावर यायला सुरुवात झाली आहे.

**व्यावसायिक क्षेत्रात नेतृत्व करताना**



**मी माझ्या सहकाऱ्यांना कायम सांगते, की तुमच्या चुका जरी झाल्या, एखाद-दुसरा शब्द कदाचित माझ्याकडून तुम्हाला बोलला जाईल पण मी कायम तुमच्या बरोबर असेन. आपण सगळे मिळून उद्‌भवलेला प्रश्न सोडवू. पण तुमच्याकडून एखाद्या ग्राहकाला जर वेडवाकडं बोललं गेलं तर त्याला मात्र माफी नाही. आम्ही हे कायम भिनवतो. आमचे ग्राहक आम्हाला कधीही सोडून जात नाहीत. त्यामुळे आमच्या बँकेचं चांगली सेवा देणारी बँक म्हणून नाव आहे.**

नेत्याचं खरं कौशल्य म्हणजे निष्ठावान अनुयायी तयार करणं. नेतृत्व करताना मी कटाक्षाने एक गोष्ट पाळते, ज्याचं श्रेय त्याला मिळायला पाहिजे. आपल्या सहकाऱ्यांचं वेळोवेळी कौतुक करणं, काही आपल्या कामातल्या गोष्टी पण त्यांच्या कौतुकात सांगणं हे केल्यानं गटाचं मनोबल वाढतं. आणखी एक महत्त्वाची गोष्ट म्हणजे आपल्याला मनात काम आणि व्यक्ती असे दोन विभाग करता यायला हवेत. काम आणि त्यातले विषय एका बाजूला आणि ती व्यक्ती आणि आपलं नातं हे दुसऱ्या बाजूला. काही प्रसंगांना मला बोलावं लागतं. बँक शाश्वत आहे आपण नाही. त्यामुळे एखाद्या चुकीला ओरडले असेन तर पुढच्या पाच मिनिटांत अगदी आवाजही खाली घेऊन मी त्यांची चौकशी करते.

परवा बँकेतल्या एका मुलीची काहीतरी चूक झाली, आणि म्हणून मी तिला रागावले, पुढच्या काही मिनिटांत मी तिच्या तब्येतीची चौकशी केली, तिला बरं नव्हतं तर औषधं दिली आणि विषय बदलला. माणसांच्या चुका कायमसाठी अशा पुढे घेऊन जाऊ नये असच कायम वाटत.

२०१९साली सहकारनगरमध्ये पाणी भरलं होतं. तिथल्या शाखेतली कागदपत्रं, लॉकर्स यांचं खूप नुकसान झालेलं होतं. जेव्हा आम्ही बँकेत गेलो तेव्हा प्रचंड भयानक परिस्थिती होती. त्यावेळेस नवरात्र बसणार होती. त्याच वेळी आमचे एक अन् एक सहकारी मदतीसाठी आले. आम्ही ती कागदपत्रं तिथून हलवली, इस्त्री, dryer अशा मिळेल त्या उपकरणांनी आम्ही कागदपत्रं वाळवली. मी एक हाक दिली आणि लोक धावून आले याचं खूप समाधान मिळालं.

आमच्या बँकेसाठी आम्ही प्रभातरोडला जागा बघत होतो. त्याच्या कायदेशीर बाबी खूप किचकट होत्या. बँकेच्या संस्थापिका आणि ज्येष्ठ संचालक यांची सगळ्यांची, बँकेची स्वतःची जागा असावी अशी इच्छा होती. ती इतक्या चांगल्या ठिकाणी मिळाली आणि ते आपल्या कारकिर्दीत घडू शकलं हा सगळ्यात मोठा पुरस्कार वाटला.

*''प्रबोधिनीतली स्मिता ठोंबरे ते भगिनी निवेदिता बँकेतल्या CEO देशपांडे मॅडम या प्रवासातल्या पूर्वार्धातील दोन वर्षांची व उत्तरार्धातल्या २५ वर्षांची मी साक्षीदार आहे हे माझे भाग्यच. आमच्या बँकेत प्रबोधिनीतल्या तीन जणी आहेत. देशपांडे मॅडम CEO झाल्या तेव्हा आणि वर्षा बुधकर मॅडम (पूर्वीच्या विप्रदास) जनरल मॅनेजर झाल्या तेव्हा मी आपल्या शाळेच्या नावावर माझी कॉलर ताठ करून घेतली होती. देशपांडे मॅडम त्यांच्या पहिल्या भेटीतच त्यांच्या तडफदार, उत्साहाने सळसळणाऱ्या आणि चैतन्यपूर्ण अशा व्यक्तिमत्त्वाची छाप पाडतात. भल्या-बुऱ्या सर्व प्रसंगात त्या अशाच असतात. ब्रँच मॅनेजर मीटिंग मधून बाहेर पडताना कायमच आम्ही त्यांच्या बोलण्याने भारावून बाहेर पडतो. त्यांनी CEO चा पदभार स्वीकारला त्यावेळी त्यांच्या आधीच्या CEO चा फार मोठा ठसा सर्वांवर होता. इतका की त्या रोलमध्ये दुसऱ्या कोणाची कल्पनाच करू शकत नव्हतो. पण मॅडमनी अल्पावधीतच स्वतःला सिद्ध केले. त्यांच्या निर्णय घेण्यात जबाबदारीपूर्ण धडाडी आहे. नवीन नऊ शाखा, स्वतःचे अद्ययावत corporate ऑफिस, स्वतंत्र व सक्षम IT विभाग आणि अशा बऱ्याच गोष्टी त्यांच्या कार्यकाळात घडल्या आहेत. भविष्यातही आमची बँक त्यांच्या सक्षम नेतृत्वाखाली अजून उंची गाठेल याची आम्हाला खात्री आहे. अतिशय बुद्धिमान, बोलण्यात परखड, विचारात सुस्पष्ट आणि वागण्यात प्रचंड सकारात्मक ऊर्जा असलेले त्यांचे व्यक्तिमत्त्व आहे. ही झाली एक बाजू. त्याच बरोबर त्या धार्मिक आहेत, प्रेमळ आहेत*

*आणि स्टाफ साठी अतिशय supportive आहेत. एका नजरेत त्या आमची मनस्थिती जोखतात आणि आस्थेने विचारपूस करतात. आमच्या व्यक्तिगत बाबी सुद्धा आम्ही त्यांच्याशी सहज व मोकळेपणाने बोलू शकतो. अनेक प्रसंगात त्यांनी मोठा आधार देऊन आमचे मनोबल वाढवले आहे. ३१ मार्चला रात्री उशिरापर्यंत year end ची कामे चालू असतात. अशा वेळी त्या घरून मस्तपैकी गरम-गरम खिचडी सगळ्यांसाठी बनवून आणतात.*

*दोन वर्षांपूर्वी मी काम करत असलेल्या सहकारनगर शाखेत पुराचे पाणी आले होते. त्यावेळी त्यांच्या आणि आमच्या जनरल मॅनेजर जयश्री चित्रे व वर्षा बुधकर यांच्या मार्गदर्शनाखाली पूर्ण बँकेच्या स्टाफने जबरदस्त team spirit दाखवत disaster management चा उत्तम धडा गिरवला होता. काहीवेळा काम करताना मनात साशंकता आली तर तू कर ग, मी आहेच ना एवढं त्यांनी बोललं तरी खूप प्रोत्साहन मिळते.*

*त्यांचे मार्गदर्शन आणि त्यांच्यातली मैत्रीण आम्हाला कायम अशीच मिळत राहो, हीच ईश्वरचरणी प्रार्थना.''*

**रेवती तेरणीकर-मुळे : १९८५ची तुकडी**
मॅनेजर,
सहकारनगर शाखा
भगिनी निवेदिता सहकारी बँक



**कुटुंबाचा व अनेक ज्येष्ठांचा सबळ पाठिंबा**

आई-वडील, सासू-सासरे, माझे पती किशोर देशपांडे जे व्यवसायाने चार्टर्ड अकाऊंटंट आहेत आणि माझी मुलगी या सगळ्यांच्या पाठिंब्याशिवाय हे काही शक्य नाही. घरातले सर्व व्यवहार, सणवार, मुलीची आजारपणं या सगळ्यात सासू-सासऱ्यांचा मोठा आधार होता. सासरे महाराष्ट्र बँकेत होते. त्यांच्या बँकेतल्या अनुभवाचा पण वेळोवेळी मला उपयोग व्हायचा. त्यांना मी बँकेत उच्च पदावर आहे याचा खूप अभिमान होता. सासूबाई पण शाळेत शिक्षिका होत्या त्यामुळे करिअर महत्त्वाचं हे त्या जाणून होत्या. त्यांनी ही नोकरी केल्यामुळे कधी अवास्तव अपेक्षा केल्या नाहीत उलट सतत सांभाळून घेत पाठिंबा दिला. या सगळ्यांनाच माझ्या कामाच्या स्वरूपाचा, येणाऱ्या ताणांचा अंदाज होता. त्यामुळे सर्वसामान्यपणे एक पत्नी म्हणून किंवा सून म्हणून अपेक्षा असतात तशा अवाजवी अपेक्षा कधीच माझ्याकडून केल्या नाहीत. मुलीनी पण तिच्या शाळेच्या वयात खूप समजूतदारपणा दाखवला. आईच आली पाहिजे शाळेत असा कधीही हट्ट केला नाही. आई-वडील आणि सासू-सासरे मुलीला सांभाळत असल्याने कधी पाळणाघरात ठेवावे लागले नाही. त्यामुळे जास्त निर्धास्तपणे मी काम करू शकले. नुसतं एवढंच नाही तर जेव्हा ताणाचे प्रसंग येतात बोलून मोकळं व्हायला पण ही हक्काची माणसं बरोबर होती. एक प्रसंग आठवतोय की कशामुळे तरी खूप उद्विग्न झाले होते. आता सारं पुरे असं वाटलं होतं. तेव्हा सासऱ्यांनी असं करायचं नाही तर लढायचं आणि पुढे जायचं असं सांगितलं होतं. त्यामुळे फक्त पाठिंबा किंवा मदत नाही तर वेळप्रसंगी योग्य तो सल्ला मिळाला हे पण खूप महत्त्वाचं होतं. घरातलं काम, घरच्या माणसांसाठीचं काम हे माझं relaxation आहे. मला गृहिणीसारखीच कामं करायलाही आवडतात आणि मी ते करत राहते. अर्थातच नियोजन केल्यावर सगळं सहज सांभाळता येतं. याशिवाय माणसं गोळा करणं ,जमवणं हे मला खूप आवडतं. त्यामुळे शेजारी, नातेवाईक या सगळ्यांशी खूप छान संबंध आहेत. वेळप्रसंगी हाक दिली तर सगळे धावून येतील असा गोतावळा जमा केला आहे.



**पती किशोर देशपांडे व मुलगी देवकी बरोबर**

आमच्या बँकेतली मा. जयश्री काळे आणि मा. रेखा भट या दोघीजणी माझ्या गुरुतुल्य व्यक्ती आहेत. त्यांच्याकडून मी perfection, उत्तमता शिकले, management शिकले. निर्णय कसे घ्यायचे, logical thinking कसं करायचं हे मी त्यांच्याकडून शिकले. सगळ्या लोकांना धरून ठेवणं, माणसांना न दुखावता निर्णय घेणं, संस्थेच्या हिताचा निर्णय घेणं या गोष्टी मी या दोघींकडून शिकले. आम्हाला Recovery हे खूप मोठं challenge असतं. मोठ्या-मोठ्या रकमेची कायद्याला हात न लावता वसुली करणं हे करावं लागतं आणि ते मी यांच्याकडून शिकले. याशिवाय आत्ता गेली सहा वर्षे अध्यक्षा मा. जयश्री कुरूंदवाडकर आणि उपाध्यक्षा मा. रेवती पैठणकर या दोघी अनुक्रमे वकील आणि सी.ए. अशा उच्च शिक्षित असल्यामुळे त्यांच्याकडून मिळणाऱ्या अनेक गोष्टी मला पुढे जायला उपयोगी पडतात. अस म्हणता येईल, की सुरुवातीच्या काळात तुम्हाला पुढे जाण्यासाठी एक भक्कम पाठिंबा किंवा आधार लागतो आणि नंतर तुमचे व्यक्तिमत्त्व फुलण्यासाठी काही नवीन गोष्टी कळाव्या लागतात, त्या या दोघींकडून मिळाल्या, असं काहीसं यांच्या बाबतीत मी म्हणेन.

खरंतर आता दोन वर्षांत मी निवृत्त होईन. १८व्या वर्षीपासून नोकरी हा आयुष्याचा भाग झालेला आहे. सरकारची, बँकांची धोरणं ही क्षणाक्षणाला बदलत आहेत. आणखी दोन वर्षांनी बँकेची काय परिस्थिती असेल हे माहीत नसल्यामुळे सांगता येत नाही. काही वेगळं करायचं आहे, घरी रहायचं आहे, याचं चित्र अजून स्पष्ट नाही पण वेळ जे मागेल ते देत जायचं आहे, हे नक्की.

आता सध्या वर्गातल्या काही मैत्रिणींशी संपर्क आहे. फार उपक्रमांसाठी वेळ काढणे अवघड आहे. आत्ताच्या पिढीला सांगायचं म्हणजे आपण बारीक सारीक गोष्टीतून खूप शिकतो. त्यावेळेस हे कशासाठी असा प्रश्न पडतो पण प्रबोधिनीवर विश्वास ठेवा.



**कन्यका प्रशालेतील पहिल्या तुकडीतल्या काहीजणी**

## RAPID FIRE

१. आवडतं पुस्तक - courtroom

२. आवडता चित्रपट- Three Idiots

३. लक्षात राहिलेला शाळेतला उपक्रम - प्रकल्प

४. लक्षात राहिलेला शिक्षक - नलूताई गुजराथी

५. छंद - माणसं गोळा करणे.

६. पहिली प्रतिक्रिया

- तुमची बँक- कर्मभूमी
- सहकार क्षेत्र - तळागाळातल्या लोकांसाठीचा आधार
- आप्पा पेंडसे- दैवत
- ज्ञान प्रबोधिनी- मातृतुल्य

**स्मिता ठोंबरे-देशपांडे**
**9850999151**
**deshpande.smita25@gmail.com**

**मुलाखत - अपूर्वा इनामदार, चिन्मयी खरे** **शब्दांकन - चिन्मयी खरे**

**संपादन - मानसी बोडस, पल्लवी गोखले - नगरकर**

**आरेखन व मांडणी - निशिगंधा खळदकर**

Write to us : jpp51_51@jnanaprabodhini.org